**<u>निशाणी क्रं. ४७ वरील कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५ अंतर्गत कलम २३ वरील अर्जावर आदेश</u>**

**(दिनांक २९/०४/२०२६)**

प्रस्तुतचे प्रकरण कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५ अंतर्गत दाखल केले असून प्रस्तूत अर्जाद्वारे अर्जदार क्र. १ व २ यांच्यासाठी कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी रू. २५,०००/— व घरभाडेपोटी अंतरीम पोटगी मिळणेकरीता मागणी केलेली आहे. गैरअर्जदाराने नि.क्र. ११ व ५४ वर त्याचे लेखी म्हणणे सादर करून प्रस्तूत अर्जातील व मूळ प्रकरणातील अर्जदाराच्या मागणीस प्रखर विरोध केला.

**२)** अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, तिचा दि. ०६/०१/२०२१ रोजी गैरअर्जदारासोबत विवाह झालेला असून अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार यांना गैरअर्जदार क्र. २ देवांश हा मुलगा झालेला आहे. अर्जदाराच्या लग्न व साखरपुड्याचा संपुर्ण खर्च अर्जदार क्र. १ च्या वडीलांनी केलेला आहे. अर्जदार क्र. १ च्या वडीलांनी गैरअर्जदाराच्या कुटुंबास रक्कम रू. ४,००,०००/—, सोन्याचे दागीने, दि. ०९/१२/२०२० रोजी २,००,०००/— रूपये व दि. १०/१२/२०२० रोजी २,००,०००/— रूपये दिलेले आहेत. त्यानंतर देखील रोख स्वरूपात लग्नाच्या दिवशी ३,००,०००/— रूपये अर्जदार क्र. १ च्या वडीलांनी दिलेले आहेत. याखेरीज अर्जदार क्र. १ च्या वडीलांनी गैरअर्जदारांना फर्निचर, कपड्यांसाठी रक्कम व संसारोपयोगी वस्तु देखील दिलेल्या आहेत.

**३)** लग्नानंतर अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदारासोबत नांदण्यासाठी औरंगाबाद येथे गेली. गैरअर्जदार व त्याच्या कुटुंबीयांनी अर्जदारास २—३ महिने चांगले नांदवले. त्यानंतर दि. २२/०४/२०२१ रोजी गैरअर्जदार व त्याच्या कुटुंबीयांनी अर्जदार क्र. १ कडून माहेरून ६,००,०००/— रूपये घेवून ये अशी मागणी केली. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ ला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. गैरअर्जदार व त्याचे कुटुंबीय हे अर्जदार क्र. १ हिला उपाशी ठेवत होते. दि. १२/०२/२०२२ रोजी गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार क्र. १ हिच्याकडे तुझ्या आईवडीलांकडून चारचाकी गाडी घेवून ये अशी मागणी केली. अर्जदार क्र. १ हिने सदर घटनेबाबत तिच्या आईवडीलांना सांगितले असता, त्यांनी अर्जदाराची समजूत काढली.

**४)** अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदाराकडून गरोदर असताना देखील गैरअर्जदार व त्याचे कुटुंबीय हे अर्जदार क्र. १ हिला शारिरीक व मानसिक त्रास देत होते. दि. १७/०४/२०२२ रोजी गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ हिला माहेरी आणून सोडले व गैरअर्जदार क्र.

१ याने परत जात असताना अर्जदार क्र. १ हीस शिवीगाळ करून तिचे व तिच्या आईवडीलांचे हातपाय तोडण्याची धमकी दिली.

**५)** एप्रिल २०२२ मध्ये अर्जदार क्र. १ च्या वडीलांनी गैरअर्जदारांसोबत चर्चा करण्याचा प्रयत्न केला परंतु, त्यास काहीही प्रतिसाद मिळाला नाही. दि. १३/०५/२०२२ रोजी अर्जदार क्र. १ हिला गैरअर्जदार क्र. १ कडून नोटीस मिळाल्यानंतर दि. २२/०५/२०२२ रोजी अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ याच्याकडे नांदण्यासाठी देवळा येथे गेली असता, गैरअर्जदार व त्याचे कुटुंबीय घरी नव्हते. त्यानंतर दि. २४/०५/२०२२ रोजी अर्जदार क्र. १ ही तिच्या वडीलांसोबत गैरअर्जदार क्र. १ याच्या औरंगाबाद येथील घरी गेली असता तेथे देखील घर बंद होते. गैरअर्जदार क्र. १ ने घटस्फोटाकरीता खोट्या मजकूरासह प्रकरण क्र. १३८/२०२२ दाखल केलेले आहे. अर्जदार क्र. १ हिच्या वडीलांनी अर्जदार क्र. १ हिला नांदण्यासाठी घेवून जाण्याकरीता घेतलेल्या बैठकीमध्ये देखील अर्जदार क्र. १ ची विनंती धुडकावून लावण्यात आली.

**६)** अर्जदार क्र. १ व २ हे अर्जदार हिच्या माहेरी राहत होते. परंतु, त्यानंतर दि. ०१/१२/२०२५ पासून रोजी ते किरायाने वास्तव्यास आहेत. गैरअर्जदाराने अर्जदारांच्या उदनिर्वाह व रहिवासाकरीता कोणतीही तरतुद केलेली नाही. अर्जदार क्र. १ हिच्या प्रसुतीचा देखील संपुर्ण खर्च तिच्या वडीलांनीच केलेला आहे. अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ व २ यांचा खर्च भागवण्यास असमर्थ आहेत. उलटपक्षी, गैरअर्जदार क्र. १ यास नोकरीमधून दरमहा ७०,०००/— रूपये पगार मिळतो. गैरअर्जदारास मौजे देवळा येथे १५ एक्कर बागायती शेती असून त्यातून देखील दरसाल २५,००,०००/— उत्पन्न मिळते. गैरअर्जदाराच्या कुटुंबीयांना देखील नोकरीमधून दरमहा १,५०,०००/— पगार मिळतो. गैरअर्जदार व त्याचे कुटुंबीय यांचे औरंगाबाद येथे फ्लॅट असून गैरअर्जदार क्र. १ याच्याकडे नेक्सॉन कंपनीची चारचाकी गाडी देखील आहे. अर्जदार क्र. १ हिच्याकडे तिच्या उदनिर्वाहाकरीता कोणतेही साधन नाही.

**७)** विवाह अर्ज क्र. ६/२०२४ या प्रकरणात दि. १८/११/२०२५ रोजी दरमहा ६,००,०००/— रूपये अंतरीम पोटगी व खर्चाचा आदेश पारीत झालेला आहे. परंतु, गैरअर्जदार क्र. १ हा सदर तुटपुंजा खर्चदेखील अर्जदारास देत नाही. म्हणुन अर्जदार क्र. १ व २ यांनी त्यांची उपजिवीका, औषधोपचार व निवा—याकरीता दरमहा २५,००,०००/— रूपये अंतरीम पोटगीची मागणी गैरअर्जदार क्र. १ याच्याकडे केलेली

आहे.

८) गैरअर्जदाराने त्याच्यावरील सर्व आरोप नाकारले. त्याने प्रस्तुतच्या अर्जावरील व नि.क्र. ११ व ५४ वरील त्याच्या लेखी जबाबात असे कथन केले आहे की, अर्जदाराचे प्रकरण हे कायदेशीर तरतुदींचा दुरूपयोग करणारे आहेत. अर्जदाराने काल्पनीक मजकूराच्या आधारे प्रस्तुतचे प्रकरण सादर केलेले आहे. कौटुंबीक हिंसाचाराच्या संदर्भाने कोणतीही विश्वसनीय घटना अर्जदाराने तिच्या अर्जात नमुद केलेली नाही. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार व त्याच्या कुटुंबीयांचा कोणताही विचार न करता स्वच्छंदी जिवन जगत होती. नांदण्याकरीता नोटीस आल्यानंतर अर्जदाराने घर बंद असल्यानंतर स्थानिक ठिकाणी चौकशी करण्या ऐवजी जिओ टॅगिंगद्वारे काढलेल्या फोटोवरून अर्जदाराची मानसिकता दिसून येते. अर्जदार क्र. १ हिची गैरअर्जदारासोबत कधीही नांदण्याची इच्छा नव्हती. तिने गैरअर्जदार व त्याच्या कुटुंबीयांवर केलेल्या छळाकडे गैरअर्जदारांनी दुर्लक्ष केल्यानंतर देखील अर्जदाराच्या विक्षीप्त स्वभावामध्ये कोणताही बदल झाला नाही. उलटपक्षी, अर्जदार ही गैरअर्जदारांची समाजामध्ये बेअब्रु करत आहे. अर्जदाराने प्रस्तुत प्रकरणात केलेले आरोप देखील काल्पनीक स्वरूपाचे आहेत.

९) अर्जदाराने गैरअर्जदार व त्याचे कुटुंबीय यांना विवाहानंतर स्विकारलेले नाही. गैरअर्जदार व त्याच्या कुटुंबीयांनी अर्जदाराचा औषधोपचार व गरोदर असतानाच्या सर्व वैद्यकीय तपासण्या केलेल्या आहेत. विवाहाच्या वेळेस गैरअर्जदार क्र. १ हा करत असलेल्या खाजगी नोकरीतून त्यास तुटपुंजा व अल्प पगार मिळत होता. त्यातून त्याच्या कौटुंबीक गरजा भागत नव्हत्या. म्हणुन त्याने पुढील शिक्षणासाठी खाजगी बॅंकेचे कर्ज घेतलेले आहे व तो औरंगाबाद येथे शिक्षण घेत आहे.

१०) अर्जदाराने गैरअर्जदाराची आर्थिक लुट करण्याकरीता खोटी कागदपत्रे तयार करून पोटगी मागण्याकरीता सदर अर्ज केलेला आहे. दि. १५/१२/२०२५ रोजीचा भाडे करारनामा हा प्रकरण सादर झाल्यानंतर विचार करून बनवण्यात आलेला आहे व त्याचा वापर करत प्रस्तुतचा अर्ज सादर केलेला आहे. अर्जदारास गैरअर्जदाराकडून कोणताही त्रास झालेला नाही. अर्जदाराने जाणुनबुजून स्वेच्छेने गैरअर्जदारासोबतचे वास्तव्य सोडून दिलेले आहे. गैरअर्जदाराने वैवाहीक संबंध पुन्हा प्रस्थापीत करण्याकरीता दिलेल्या नोटीसनंतर देखील अर्जदाराने त्याबाबत कोणतेही पाउल उचललेले नाही तसेच गैरअर्जदार व त्याच्या आईवडीलांची कोणतीही चौकशी देखील केलेली नाही. उलटपक्षी, गैरअर्जदाराने वेगवेगळ्या

न्यायालयात खोट्या व बनावट आरोपांच्या आधारे कारवाया केलेल्या आहेत.

**११)** मा. उच्च न्यायालयाने फौ.प्र.सं. कलम ४८२ प्रमाणे कलम ४९८(अ) हे अर्जदाराने सादर केलेले प्रकरण खरीज केलेले आहे. प्रस्तुतचे कौ. हिं. कायद्याअंतर्गतचे प्रकरण देखील मा. उच्च न्यायालयाने गैअर्जदाराच्या कुटुंबीयांच्या विरूध्द खारीज केलेले असून सदर प्रस्तुत प्रकरण हे केवळ गैरअर्जदार अक्षय याच्याविरूध्दच चालवण्याचे आदेश दिलेले आहेत. यावरून अर्जदाराने केलेले आरोप हे तकलादू व केवळ गैरअर्जदारांचा छळ करण्याच्या उद्देशाने केले असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते.

**१२)** अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदारासोबतच्या विवाह संबंधातून सुरूवातीपासूनच नाराज होती. तिने स्वत:हून गैरअर्जदारासोबतचे विवाह संबंध ब—याच वर्षांपुर्वी संपुष्टात आणलेले आहेत. गैरअर्जदार हा सुशिक्षीत बेकार असून तिने गैरअर्जदारापासून स्वत:हून विभक्ती घेत तिच्या माहेरी वास्तव्य चालु केलेले आहे. अर्जदार ही स्वत: बी. कॉम पदवीधर असून खाजगी व्यवसाय करते. तिचे वडील रमेश काळे यांच्या मिळकतीमध्ये देखील अर्जदाराचा अविभक्त हिस्सा आहे. अर्जदाराने सादर केलेला भाडेकरारनामा हा केवळ अंतरीम पोटगी मागण्यासाठी तयार केलेला आहे. विवाह अर्ज क्र. ६/२०२४ मध्ये अर्जदारास दरमहा ६,०००/— रूपये इतकी पोटगी देण्याबाबतचा आदेश झालेला आहे. असे असताना देखील अर्जदाराने प्रस्तुत कायद्याचा दुरूपयोग केलेला आहे. म्हणुन गैरअर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

**१३)** प्रस्तुतचा अर्ज हा अंतरीम स्वरूपाचा आहे. सध्यस्थितीत प्रस्तुतचे प्रकरण हे अर्जदार बाजुच्या पुराव्यासाठी नेमलेले आहे. सध्यस्थितीत अर्जदाराने स्वत:करीता दोन साक्षीदार तपासले असून साक्षीदार क्र. ३ याचा उर्वरीत उलटतपास प्रलंबीत आहे. अर्जदाराने अद्यापपर्यंत प्रस्तुत अर्जातील नि. क्र. २२ प्रमाणे तिचे मालमत्ता व दायीत्वाबाबतचे शपथपत्र, नि. क्र. २९ ते ४१ वरील ७/१२ उतारे व इतर महसुलीय कागदपत्रे, नि.क्र. ४२ वरील ८—अ उता—याची प्रत, नि.क्र. ७ वरील करारनामा, नि.क्र. ५२ वरील दस्त यादीसहची कागदपत्रे व स्वत:च्या पुराव्यादरम्यान सादर करण्यात आलेल्या पावत्या तसेच नि.क्र. ९९ ते १०८ वरील आयकर विवरण पत्रे इ. कागदपत्रे सादर केलेली आहेत.

**१४)** उलटपक्षी, गैरअर्जदाराने नि. क्र. ५३ प्रमाणे स्वत:चे मालमत्ता व दायीत्वाबाबातचे शपथपत्र नि.क्र. १५ व २३ सह, मा. उच्च न्यायालय यांच्या दि. १०/०७/२०२४ रोजीच्या आदेशांची प्रत, नि. क्र. २५ सह नि.फौ.खं.क्र. २१/२०२३

मधील आदेशाची प्रत व फौजदारी अर्ज क्र. ४०३१/२०२२ मधील दि. २४/०१/२०२५ रोजीच्या मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रमाणीत प्रत, नि. क्र. २८ सह फौजदारी अर्ज क्र. ४३२२/२०२२ मधील दि. ०४/०९/२०२५ रोजीच्या मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रमाणीत प्रत इ. कागदपत्रे सादर केलेली आहेत..

**१५)** प्रकरणात नि.क्र. ४ प्रमाणे कौटुंबीक हिंसाचाराबाबतचा अहवाल देखील संरक्षण अधिकारी यांच्यामार्फत सादर करण्यात आला आहे.

**१६)** प्रस्तुतचा अर्ज हा अंतरीम स्वरूपाचा आहे. सध्यस्थितीत प्रस्तुत प्रकरण हे अर्जदारातर्फे उर्वरीत साक्षीदारांच्या पुराव्याकरीता नेमण्यात आलेले आहे. उभयपक्षकारांनी प्रस्तुत प्रकरणांमध्ये एकमेकांविरूध्द केलेले आरोप—प्रत्यारोप हे प्रस्तुत प्रकरणाच्या सध्यस्थितीत दोन्ही बाजूंचा पुरावा पुर्ण झालेला नसल्याकारणाने विचारात घेता येवू शकत नाहीत. म्हणुन प्रस्तुतचा अर्ज निकाली काढते वेळेस अर्जदार क्र. १ व २ यांच्या मागणीप्रमाणे ते अंतरीम आदेशास पात्र आहेत काय एवढाच मुद्दा या न्यायालयासमोर विचाराधीन आहे.

**१७)** प्रस्तुत प्रकरण व अर्जामध्ये, अर्जदाराने जरी अर्जदार अक्षय याच्या कुटुंबातील इतर व्यक्तींविरूध्द कौटुंबीक हिंसाचाराचे आरोप केलेले असले तरी देखील मा. मुंबई उच्च न्यायालय यांच्या फौजदारी अर्ज क्र. ४३२२/२०२३ मधील दि. ०४/०९/२०२५ रोजीच्या आदेशान्वये गैरअर्जदार क्र. १ याच्या व्यतिरीक्त इतर गैरअर्जदार क्र. २ ते ६ यांच्याविरूध्दचे प्रस्तुतचे कौटुंबीक हिंसाचार कायद्याअंतर्गतचे प्रकरण खारीत करण्यात आले असल्याकारणाने, गैरअर्जदार अक्षय याच्याव्यतिरीक्त इतर व्यक्तींविरूध्द कोणताही आदेश पारीत करता येवू शकत नाही. ही बाब या ठिकाणी नोंद करणे आवश्यक आहे.

**१८)** संपुर्ण प्रकरणाचे अवलोकन केले असता, अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार यांच्यामधील वैवाहीक नातेसंबंध उभय पक्षकारांना मान्य आहेत. अर्जदार क्र. २ हा अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार यांचा अज्ञान मुलगा आहे ही बाब देखील अविवादीत आहे. सध्यस्थितीत अर्जदार क्र. १ व २ हे गैरअर्जदारापासून विभक्त राहत आहेत हे अर्जदाराचे कथन देखील गैरअर्जदाराने नाकारलेले नाही.

**१९)** अर्जदाराने नि.क्र. ६० वरील भाडेकरारनामा प्रकरणात सादर केलेला असून सदर भाडे करारनाम्याबाबत विचार केला असता, सदर करारनामा हा नोंदणीकृत नसल्याकारणाने त्यास कायदेशीर वैधता प्राप्त होत नाही. तसेच प्रस्तुत प्रकरण हे दि. १३/०४/२०२३ रोजी

सादर करण्यात आलेले आहे. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे दि. १७/०४/२०२२ रोजीपासून ती गैरअर्जदारापासून कळंब येथे विभक्तपणे राहत आहे. असे असताना देखील तब्बल ३ वर्षांनी अर्जदाराने प्रस्तुतचा भाडे करार तयार केला या तथ्याचा विचार करता, सदर भाडे करार हा विश्वासार्ह स्वरूपाचा वाटत नाही. म्हणुन सदर भाडे करारामध्ये नमुद घरभाड्याच्या रक्कमेप्रमाणे निवासी व्यवस्थेकरीता गैरअर्जदारास आदेशीत करणे योग्य ठरत नाही.

**२०)** अर्जदाराने प्रकरणामध्ये सोने व फर्निचर इ. बाबतच्या अनेक पावत्या प्रकरणात सादर केलेल्या आहेत. सदर पावत्यांवरून देखील सदर सोने व फर्निचर हे गैरअर्जदारांच्या ताब्यात आहेत असा ठोस निष्कर्ष काढता येवू शकत नाही. अर्जदाराने प्रस्तुत प्रकरणामध्ये कौटुंबीक हिंसाचाराबाबतच्या अनेक घटना शपथेवर नमुद केलेल्या आहेत. गैरअर्जदाराने सदर घटना नाकारलेल्या आहेत.

**२१)** असे असले तरी देखील प्रस्तुत कायद्यामधील घरगुती हिंसाचार या संज्ञेचा विचार करता, अर्जदाराने सादर केलेला पुरावा सध्यस्थितीत जरी तिच्यावरील शारिरीक, लैंगिक, शाब्दीक इ. स्वरूपाच्या कौटुंबीक छहाबाबत संदीग्ध स्वरूपाचा वाटत असला तरी देखील प्रस्तुत कायद्यातील कौटुंबीक हिंसाचार ही संज्ञा सर्वांगीण व व परिपुर्ण स्वरूपाची असल्याकारणाने अर्जदाराच्या झालेल्या भावनिक किंवा आर्थिक स्वरूपाच्या छळाचा देखील प्रसतुतचा अर्ज निकाली काढतेवेळेस विचार करणे आवश्यक आहे.

**२२)** विवाह अर्ज क्र. ६/२०२४ मध्ये जरी अर्जदारास दरमहा ६,०००/— रूपये अंतरीम पोटगी देण्यात आलेली असली तरी देखील कौटुंबीक हिंसाचार कायद्याच्या व्याप्तीचा विचार करता, विवाह अर्ज ६/२०२४ मधील पोटगी ही निश्चितपणे पुरेसी नाही. अर्जदार क्र. १ व २ हे आज रोजी गैरअर्जदारापासून विभक्त राहत आहेत. त्यांच्या निवासाकरीता गैरअर्जदाराने स्वखुशीने व स्वत:वरील जबाबदारी पार पाडण्याच्या उद्‌देशाने कोणतीही योग्य तरतुद केलेली असल्याचे गैरअर्जदाराने दाखवून दिलेले नाही.

**२३)** कौटुंबीक हिंसाचार कायद्याच्या कलम २०(२) प्रमाणे अर्जदाराला देण्यात येणारी आर्थिक मदत ही पुरेशी व पक्षकारांच्या जिवनमानाशी सुसंगत असणे अपेक्षीत आहे. त्याअनुशंगाने गैरअर्जदाराच्या जिवनमानाचा विचार करता, गैरअर्जदार हा औरंगाबाद सारख्या शहरी भागात राहतो. सदर गैरअर्जदाराकडे नेक्सॉन कंपनीची चारचाकी गाडी असल्याचे अर्जदाराचे कथन देखील गैरअर्जदाराने नाकारलेले नाही. गैरअर्जदार हा त्याच्या नि.क्र. ५३ वरील शपथपत्राप्रमाणे व्यावसायीक शिक्षण घेतलेला उच्च शिक्षीत पुरूष आहे.

त्याने त्याच्या नि.क्र. ५३ वरील शपथपत्रामधील कलम बी. ५, या सदरामध्ये त्याने स्वत:हून अर्जदाराच्या पोटगी व भविष्यातील तरतुदींकरीता कोणतीही तरतुद केली नसल्याचे स्वत: मान्य केलेले आहे.

**२४)** अर्जदाराच्या नि. क्र ५३ वरील शपथपत्राचा विचार करता अर्जदर क्र. १ व २ हे व्यावसायीक उच्च शिक्षण घेतलेल्या व्यक्तीचे पत्नी व मुलगा आहेत. प्रस्तुत कायद्यातील तरूतुदींचा तसेच प्रस्तुत कायद्याच्या उद्देशांचा विचार करता, गैरअर्जदाराने अर्जदाराच्या उदर्निवाह, औषधोपचार तसेच निवासी व्यवस्थेकरीता स्वत:हून कोणतीही तरतुद न करणे हे गैरअर्जदाराचे स्वत:ची जबाबदारी टाळणारे कृत्य म्हणजे निश्चितपणे अर्जदारावर होणारा भावनिक व अर्थिक स्वरूपाचा कौटुंबीक हिंसाचारच आहे.

**२५)** अशा परिस्थितीमध्ये अर्जदार क्र. १ व २ यांना व्यावसायीक उच्च शिक्षीत व्यक्तीचे पत्नी व मुलगा या नात्याने साजेसा निर्वाह भत्ता मिळणे अपेक्षित आहे. अभिलेखावर जरी गैरअर्जदाराच्या सध्याच्या उत्पन्न अथवा पगाराबाबतची ठोस कागदपत्रे उपलब्ध नसली तरी देखील गैरअर्जदाराच्या स्वत:च्याच नि.क्र. ११ वरील अतिरीक्त कथनाप्रमाणे त्याच्या विवाहाच्या वेळेस तो नोकरी करत होता व त्याने पुढील शिक्षणाकरीता कर्ज देखील घेतलेले आहे. याचाच अर्थ गैरअर्जदाराच्या कथनाप्रमाणे सध्या जरी तो नोकरी करत नसला व गैरअर्जदाराने स्वत:चे सध्याचे उत्पन्न प्रामाणीकपणे उघड केलेले नसले अथवा उत्पन्नाबाबतची कागदपत्रे पटलावर सादर केलेली नसली तरी देखील तो उच्च शिक्षीत व अनुभवी नोकरदार असल्याकारणाने उत्तम उत्पन्न मिळवण्याच्या व चांगले कौटुंबीक जिवनमान जगण्याच्या पात्रतेचा आहे.

**२६)** उलटपक्षी, अर्जदार ही सध्यस्थितीत तिच्या तीन वर्षाच्या मुलासह कळंब येथे राहत आहे. अभिलेखावर उपलब्ध वैद्यकीय कागदपत्रांप्रमाणे अर्जदार क्र. १ व २ यांचे चौधरी बाल रूग्नालय व द्वारका हॉस्पीटल इ. रूग्णालयांमध्ये वैद्यकीय उपचार देखील झालेले आहेत. अर्जदार क्र. २ हा सध्या केवळ तीन वर्षे वयाचा आहे. या सर्व बाबी विचारात घेवून कळंब सारख्या शहरात लहान बालकासह (शैक्षणीक खर्च विचारात न घेता) एखाद्या व्यक्तीस सामान्यपणे साजेसे जिवनमान जगण्यासाठी सर्वसाधारणपणे दरमहा १८,०००/— रूपये ते २०,०००/— रूपयांची आवश्यकता भासणे सामान्य ठरू शकते. अर्जदारास विवाह अर्ज क्र. ६/२०२४ या प्रकरणामध्ये दरमहा ६,०००/— रूपये पोटगीचा आदेश देण्यात आलेला आहे. या सर्व बाबींचा तसेच अर्जदारांच्या दैनंदीन उदर्निवाह, निवास

इ. बाबतच्या गरजा गैरअर्जदार याची पार्श्वभूमी, राहणीमान, शैक्षणीक पात्रता व गैरअर्जदाराची अर्जदार क्र. १ व २ यांच्या प्रती असलेली पती व पिता या नात्याने असलेली नैतिक व कायदेशीर जबाबदारी यांचा विचार करता, अर्जदार क्र. १ व २ यांना प्रस्तुत प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत प्रत्येकी दरमहा ५,०००/— रूपये व निवासी व्यवस्थेकरीता दरमहा २,०००/— अशी एकूण दरमहा १२,०००/— पोटगी आदेशीत करणे योग्य ठरते. म्हणुन, उपरोक्त विवेचनाच्या परिणामी, खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो:—

## आदेश

(१) नि.क्र. ४७ वरील अंतरीम अर्ज अशंत: मंजूर करण्यात आला.

(२) गैरअर्जदार याने अंतरीम पोटगी व निवासी व्यवस्था म्हणून अर्जदार क्रं. १ व २ यांना एकत्रितपणे दरमहा रू. १२,०००/—(अक्षरी बारा हजार फक्त) प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासुन म्हणजेच दि. १७/१२/२०२५ पासून ते मूळ अर्ज निकाली लागेपर्यंत द्यावेत.

(३) या आदेशाची प्रत उभयपक्षकारांना तसेच संरक्षण अधिकारी यांना विनामुल्य पुरविण्यात यावी.

KEDAR KISHOR CHAUDHARI
Digitally signed by KEDAR KISHOR CHAUDHARI
Date: 2026.04.29 17:02:38 +0530

**(के. के. चौधरी)**

दि. २९/०४/२०२६

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
कळंब, जि.उस्मानाबाद.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | Pankaj A. Kshirsagar (Stenographer-3) |
| Court Name | :- | 2nd Jt. Civil Judge (Jr. Dn.) and J.M.F.C., Shahapur, Dist. Thane. |
| Date | :- | 29/04/2026 |
| Order signed by the presiding officer on | :- | 29/04/2026 |
| Order uploaded on | :- | 29/04/2026 |